# वार्षिक स्नेहसंमेलन अहवाल २०१६-२०१७

सत्र २०१६-१७ च्या वार्षिक स्नेहसंमेलनाची जवाबदारी प्रभारी प्राध्यापक या नात्याने मला सोपविण्यात आलेली होती. या वर्षी स्नेहसंमेलनाची पहिली मिटिंग दिनांक २२ ऑक्टोबर २०१६ रोजी प्राचार्य कक्षात झाली. स्नेहसंमेलनांतर्गत येणाऱ्या वेगवेगळया विभागांचे प्रभारी प्राध्यापक यांच्यासह स्नेहसंमेलना संदर्भात चर्चा झाली. स्नेहसंमेलनाचा प्राथमिक आराखडा तयार करण्यात आला. उद्घाटक म्हणून कुणाला बोलवावे याचीही नावे घेण्यात आलीत. हिवाळी सुट्ट्यानंतर प्रत्यक्ष कामाला सुरवात झाली. नुकत्याच सुरु झालेल्या सेमिस्टरच्या परीक्षांमुळे स्नेहसंमेलन जानेवारीमध्ये घेण्याचे ठरले.

या वर्षी जनरल विभाग प्रभारी प्राध्यापक डॉ शंभरकर, स्वागत विभाग प्रभारी प्राध्यापक डॉ बलखंडे, बक्षीस विभाग प्रभारी प्राध्यापक प्रा. पिशे, विविध मनोरंजन विभाग प्रभारी प्राध्यापक डॉ गजघाटे, ऑर्केस्ट्रा प्रभारी प्राध्यापक डॉ झिन्झर्डे, क्रीडा विभाग प्रभारी प्राध्यापक प्रा. कोपुलवार, discipline विभाग प्रभारी प्राध्यापक प्रा. दामले या प्रमाणे जवाबदारी देण्यात आली होती. सर्व प्रभारी प्राध्यापकांनी आपापल्या विभागाची तयारी अतिशय उत्तम पद्धतीने केली. दिनांक ११ जानेवारी २०१७ रोजी सकाळी साडे नऊ वाजता श्रीमती कांचन गडकरी यांच्या हस्ते उद्घाटन, त्यानंतर आपल्या माजी विद्यार्थिनी श्रीमती ऋतुजा गडकरी यांच्या हस्ते आनंद बझार चे उद्घाटन, दुपारी २ वाजता ऑर्केस्ट्रा स्वर चांदणे आणी ४ वाजता विविध मनोरंजन इंद्रधनुष्य २०१७ असे कार्यक्रम पार पडले. उद्घाटन कार्यक्रमाला अध्यक्ष म्हणून नागपूर शिक्षण मंडळाचे अध्यक्ष श्री अशोकजी गांधी, विशेष अतिथी म्हणून नागपूर शिक्षण मंडळाचे सचिव डॉ हरीशजी राठी तसेच नागपूर शिक्षण मंडळाचे अन्य माननीय सदस्य उपस्थित होते. आनंद बझारसाठी प्रा. शेंडे आणि लोकांच्या शाळेच्या शिक्षिका आणि आपल्या माजी विद्यार्थिनी प्रा. अचला कान्हे या परीक्षक म्हणून उपस्थित होत्या. या वेळी सर्वांनी आनंद बझरचा आनंद घेतला.

स्वर चांदणे या संगीत कार्यक्रमात नव्या जुन्या श्रवणीय गाण्यांचा सुरेख मेळ ऐकायला मिळाला तर विविध मनोरंजन कार्यक्रमात वेगवेगळे नृत्यप्रकार आणि सामाजिक विषयांवरील लघुनाटिका पाहायला मिळाले. अतिशय उत्तम आयोजन आणि सादरीकरण हे दोन्ही कार्यक्रमांचे वैशिष्ट्य म्हणावे लागेल. विविध मनोरंजन कार्यक्रमासाठी प्रा. डॉ. गजभिये आणि Modern School च्या शिक्षिका सौ रितिका दलाल या परीक्षक म्हणून उपस्थित होत्या. परीक्षणे काम त्यानी चोख पार पडले.

दिनांक १२ जानेवारी २०१७ रोजी सकाळी ११ वाजता बक्षीस वितरण कार्यक्रम पार पडला. यावेळी महाविद्यालयाच्या माजी विद्यार्थिनी विधिज्ञ तेजीस्विनी देशमुख - विरखरे या उपस्थित होत्या. या वेळी त्यांनी विद्यार्थिनींना ध्येय ठरवून त्यानुसार काम करण्याचे आवाहन केले. अशा रीतीने प्रभारी प्राध्यापकांच्या सहकार्यामुळे आणि सूचनांमुळे सर्व ठराविक कार्यक्रम नियोजित आणि यथायोग्य पार पडले.

















वार्षिक स्नेहसंमेलन
पारितोषिक वितरण समारंभ




महाल, नागपुर.

